# पद्मश्री डॉ.ग.गो.जाधव महाविद्यालय गगनबावडा

## कार्यक्रम अहवाल

### पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव महाविद्यालयात मानसिक आरोग्य विषयावर कार्यशाळा

पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव महाविद्यालय, गगनबावडा येथे शिवाजी विद्यापीठाच्या अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत मानसिक आरोग्य या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. कार्यशाळेचे उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष प्रा. सतिश देसाई तर, अध्यक्षस्थानी प्र.प्राचार्या डॉ. विद्या देसाई होत्या. कार्यशाळा तीन सत्रामध्ये संपन्न झाली. पहिल्या सत्रात कोतोली कॉलेजच्या प्रा. जगदीश सरदेसाई यांनी किशोरवयीन युवकांचे मानसिक आरोग्य या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांच्या व्याख्यानात त्यांनी मानसिक आरोग्य म्हणजे काय? त्यांचे महत्त्व, संकल्पना, चांगल्या मानसिकतेसाठी आवश्यक गोष्टी, भावनांचा आणि विचारांचा शरीरावरील परिणाम इत्यादी बाबत मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात आनंदीबाई रावराणे, वैभववाडी कॉलेजचे प्रा. डॉ. रमेश गुलदे यांनी मानसिक आरोग्य आणि ताणतणाव व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन करताना मानसिक आजार टाळण्यासाठी ताण तणाव व्यवस्थापनाचे वेगवेगळे उपाय व थेरिपीबद्दल माहिती दिली. तसेच सत्रामध्ये प्रमाणपत्र वितरण, सहभागी विद्यार्थी मनोगत आणि समारोप घेण्यात आला. प्रास्ताविक अग्रणी समिती समन्वयक प्रा. आदिनाथ कांबळे, वक्ते परिचय प्रा. डॉ. एस. एस. पानारी, सुत्रसंचलन प्रा. डी. के. पाटील तर, आभार प्रा. वंदना पाटील यांनी केले. यावेळी प्रा. एच. एस. फरास, प्रा. आर. आर. सरनोबत, प्रा. एस. एस. घाटगे तसेच, क्लस्टरमधील विविध महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

